| MHKO110004182017 | **नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१७**<br>**निशाणी क्रमांक ६१ वरील आदेश**<br>**( श्रीमती आक्कुबाई आप्पा नाईक वगैरे विरुध्द बापू कृष्णा नाईक वगैरे)** |
|---|---|

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत कामी वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा वादीने अतिक्रमण काढून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे वर्णन परिशिष्ठ १ ब मध्ये अनावधानाने व नजरचुकीने दावा मिळकत १ ब ऐवजी दावा मिळकत १ क असे लिहीणेत आलेले आहे. तरी दावामधील परिशिष्ठ १ब मध्ये दावा मिळकत १ क ऐवजी दावा मिळकत १ ब अशी दुरुस्ती होवून मिळणेविषयी विनंती केली आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार नाही. तसेच सदरची दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही व दावेचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत कामी प्रतिवादींतर्फे संधी देऊनदेखिल म्हणणे दाखल न केल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविणेत आला.

**०४.** प्रस्तुतचा अर्जाचे अवलोकन केले आणि वादीच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन खालील मुद्दे माइया पुढे उपस्थित झाले त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांनी मागीतलेल्या दुरुस्तीमुळे त्यांचे मुळ दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे काय ?` | **...नाही** |

| | | |
|---|---|---|
| २. | सदरची दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | **... होय** |
| ३. | काय आदेश ? | **...वादीचा अर्ज मंजूर करणेत आला** |

## **–कारणमिमांसा–**

**०५.** प्रस्तुत दावा, तसेच अर्ज व वादीच्या विद्वान विधिज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले. युक्तीवादा दरम्यान वादीच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांच्या अर्जातील मजकूराची पुनरावृत्ती केली आहे.

**०६.** प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर नियमात सांगितल्याप्रमाणे जर दाव्याचे स्वरुप बदलत नसेल व करण्यात येणारी दुरुस्ती ही पक्षकारातील वाद मिटवणेसाठी तसेच दावा गुणवत्तेवर निकाल होणेसाठी आवश्यक असेल तर सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास काही अडचण नाही. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द अतिक्रमण काढून मिळणेकरीता दाखल केला आहे. दावा मिळकतीमधील परिशिष्ठ १ब मध्ये दावा मिळकत १ क ऐवजी दावा मिळकत १ ब असा मजकूर नमूद करणेबाबत दुरुस्ती मागणी केली आहे. सबब दाव्याचे स्वरुप व वादीचे वादपत्रातील कथन पाहता वादीने मागितलेली दुरुस्ती ही दिल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. उलटपक्षी पक्षकारामध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी मदत होणार आहे. दुरुस्तीस मंजूरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. उलटपक्षी प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादींमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिवादी यांना पुरावा देणेची संधी असलेने सदर दुरुस्तीमुळे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी मागत असलेली दुरुस्ती ही प्रथमदर्शनी दाव्याची कार्यवाही लांबविणेच्या उद्देशाने दिसून येत नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ चे उत्तर

नकारार्थी व मुद्दा क्रमांक २ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्रमांक ३ करिता खाली आदेश पारीत करते.

## – आदेश –

**१.** वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी ६१) मंजूर करणेत येत आहे.

**२.** वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेली दुरुस्ती या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत वादपत्रात करणेची आहे.

**३.** वादीने सदर वादपत्राची दुरुस्त प्रत सत्वर द्यावी.

SMITA JAGANNATH PENDE
Digitally signed by SMITA JAGANNATH PENDE
Date: 2024.11.11 16:35:24 +0530

दिनांकः– ०८/११/२०२४
ठिकाण – पेठवडगांव

( श्रीमती एस.जे.पेंडे )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पेठवडगांव